वर्ष १७ वे

अंक ३ रा

सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण

## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा,
## विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम - निमंत्रण पत्रिका

-: कार्यक्रमाचे स्थळ :-

**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,**

मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.

**रविवार दि. ०६.०८.२०१७ रोजी सकाळी १०.०० वा.**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

यांचे मुखपत्र

# संवाद

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट).
- तिसऱ्या व चौथ्या मजल्याच्या बांधकामाचा अपेक्षित खर्च रु. **एक कोटी.**
- प्रत्येक मजल्यावर ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या.
- खोलीचा आकार १०′ x १४′
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**ऑगस्ट-सप्टें.-ऑक्टो.-नोव्हेंबर २०१७**

फक्त सभासदांकरिता

(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ११००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

- **तळमजला व दोन मजले बांधून पूर्ण झाले असून त्यामध्ये ८० विद्यार्थी राहात आहेत.**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक : २२. जुलै, २०१७ )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.०६.०८.२०१७** रोजी **सकाळी १०.३० वा. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,** मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५. येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.२१.०८.२०१६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.
२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २०१६-२०१७ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.
३) सन २०१७-२०१८ साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
४) भावी कार्याची दिशा ठरविणे.
५) सन २०१७-२०१८ साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.
६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

**सूचना :-**

१) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.
२) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल.
३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह **दि.३०.०७.२०१७** पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

**❊ आपले नम्र ❊**

**हौसाराम घोडके**
अध्यक्ष

**इंजि.विजयकुमार ढुबे**
अध्यक्ष, बांधकाम समिती

**मधुकर शिरोळे**
उपाध्यक्ष

**सुनील पोटे**
सेक्रेटरी

**प्रा.गोरक्ष जगताप**
सहसेक्रेटरी

**बाजीराव जगदाळे**
कार्यवाहक

**अशोक वाबळे**
सहकार्यवाहक

**सदस्य :- सखाराम गागरे, डॉ.बाळासाहेब बांडे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, काशिनाथ गायकवाड, रामदास शिर्के, मुरलीधर चौधरी, बाळासाहेब येणारे, माधव गायके, सुनील निंबाळकर, विलास ढुबे, किरण तिकोने.**

**❊ कार्यक्रमाचे स्थळ ❊**

**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,** मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.
**रविवार दि. ०६.०८.२०१७ रोजी सकाळी १०.०० वा.**
**संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा वार्षिक स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम **रविवार दि.०६.०८.२०१७** रोजी **सकाळी १० वा. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,** मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५ येथे खालील सन्माननियांच्या उपस्थितीत आयोजित केलेला आहे.

*** अध्यक्ष ***

**मा.ब्रिगेडीयर भिमराज कुंडलीक भालसींग**

*** प्रमुख पाहुणे ***

**मा.डॉ.सर्जेराव निमसे**

माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड
माजी कुलगुरू, लखनौ विद्यपीठ, उत्तर प्रदेश.

तरी आपण अगत्य उपस्थित रहावे, ही विनंती.

*** आपले नम्र ***

**हौसाराम घोडके** – अध्यक्ष
**इंजि.विजयकुमार ठुबे** – अध्यक्ष, बांधकाम समिती
**मधुकर शिरोळे** – उपाध्यक्ष
**सुनील पोटे** – सेक्रेटरी
**प्रा.गोरक्ष जगताप** – सहसेक्रेटरी
**बाजीराव जगदाळे** – कार्यवाहक
**अशोक वाबळे** – सहकार्यवाहक

**सदस्य :- सखाराम गागरे, डॉ.बाळासाहेब बांडे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, काशिनाथ गायकवाड, रामदास शिर्के, मुरलीधर चौधरी, बाळासाहेब येणारे, माधव गायके, सुनील निंबाळकर, विलास ठुबे, किरण तिकोने.**

### * कार्यक्रमाचे स्थळ *

**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयर्स,**
मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.
**रविवार दि. ०६.०८.२०१७ रोजी सकाळी १०.०० वा.**
**संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

**कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचा आस्वाद घ्यावा ही विनंती.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

सालाबादप्रमाणे याही वर्षी दि. ६ ऑगस्ट २०१७ रोजी आपल्या मंडळातर्फे स्नेहमेळावा तसेच विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमास आपल्या अहमदनगर जिल्ह्यातील दोन उच्चशिक्षित मार्गदर्शक **ब्रिगेडीयर भालसिंग व माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे** हे उपस्थित राहून पारनेरकरांना प्रबोधित करणार आहेत. **त्यामुळे हा शर्करायोग आपण कोणत्याही परिस्थितीत चुकवू नये असे मी आपणास आवाहन करतो!**

या वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाचे नुतनीकरणाचे काम प्रगतिपथावर असल्याने फिरोदिया हॉलमध्ये कार्यक्रम आयोजित केला आहे. खरं तर पारनेर तालुका मित्र मंडळाचे कामकाज श्री.हौसाराम घोडके यांच्या नेतृत्वाखाली अतिशय प्रामाणिकपणे व चांगले चालले आहे ही वस्तुस्थिती असली तरी मंडळाच्या या स्नेहमेळाव्यामधील उपस्थितींची संख्या फारच कमी पडतेय की काय असे वाटू लागते. माझी आपणा सर्वांना हात जोडून विनंती आहे की एकदा तरी पारनेर तालुका मित्र मंडळाचे कार्य पाहण्यासाठी आपण कुटुंबासहीत या स्नेहमेळाव्यामध्ये सहभागी व्हाच!

आता आपल्या विद्यार्थी वसतिगृहाच्या चौथ्या व पाचव्या मजल्यावर ग्रंथालय व अभ्यासिका सुरू करण्याचा विचार आहे. काही सूचना असल्यास जरूर कळवा. त्यासाठी स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने वसतिगृहासही भेट द्या.

मागील अंकामध्ये नमूद केल्याप्रमाणे किन्ही गावामध्ये श्री.नानाभाऊ खोडदे व श्री.किसनराव मुळे यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने पूर्ण केलेल्या जलशिवाराच्या कामामध्ये आता झालेल्या पावसामुळे सर्व चाऱ्या भरून पाणी गावातच जिरवण्याचे कार्य अत्यंत यशस्वी झाले आहे. त्यांचा हा आदर्श आपण सर्वांनी घेण्याजोगा आहे, असे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

या अंकात यावर्षी १०-१२ वी मध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. बऱ्याचशा विद्यार्थ्यांनी ९०% च्या वर गुण प्राप्त केले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन! कु.निकिता ठुबे या मुलीने इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त केल्यानंतर अभिनयाच्या आवडीमुळे दिल्ली येथील नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये प्रवेश मिळविला आहे. त्यामुळे पारनेरकर मुले नाट्य व चित्रपट क्षेत्रामध्ये सुद्धा मागे नाहीत, असे मला अभिमानाने नमूद करावेसे वाटते. कु.निकिताचे अभिनंदन!

'कर्तृत्व पारनेरकरांचे' या सदरामध्ये प्रा.डॉ.संभाजी पठारे यांच्या कर्तृत्वाचे संकलन केले आहे. हे जरूर वाचा.

या वर्षी सरासीएवढा पाऊस पडत असल्याने समाधान व्यक्त करतो. आपल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व ग्रामस्थांचा गौरव करण्यासाठी आपण उपस्थित राहावे असे आवाहन करून मी संपादकीयास अर्धविराम देतो!

जय जिजाऊ! जय शिवराय!!

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० |
| इंजि.विजयकुमार ठुबे | अध्यक्ष,बां.स. | ९४२२०२६२२५ |
| श्री.मधुकर शिरोळे | उपाध्यक्ष | ९९२२१६६१२५ |
| श्री.सुनील पोटे | सेक्रेटरी | ९२२६९२१०८८ |
| श्री.प्रा.गोरक्ष जगताप | सहसेक्रेटरी | ९८६०९०७६१८ |
| श्री.बाजीराव जगदाळे | कार्यवाहक | ९०११०२१४३० |
| श्री.अशोक वाबळे | सहकार्यवाहक | ९८८१६०८३५७ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | सदस्य | ९८२२०५१५९३ |
| श्री.सखाराम गागरे | सदस्य | ९७३००७५०३३ |
| श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| श्री.मुरलीधर चौधरी | सदस्य | ९३२५६३५२४१ |
| श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| श्री.बाळासाहेब येणारे | सदस्य | ९९२२९६४८२५ |
| श्री.काशिनाथ गायकवाड | सदस्य | ९४२२०१७९४० |
| प्रा.माधव गायके | सदस्य | ९८२२९९५०९७ |
| प्रा.सुनील निंबाळकर | सदस्य | ९४२२२२२०३० |
| श्री.विलास ठुबे | सदस्य | ९४२३४६५९८४ |
| श्री.किरण तिकोणे | सदस्य | ९८२२३४६१३८ |

## वसतिगृह प्रवेश

**पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे** चे सर्व सोयींनी युक्त असे **वसतिगृह** मंगलनगर, गल्ली नं. ८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे असून प्रवेशासाठी खालील पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.


**व्यवस्थापक - श्री.संजय जंगम - मो. ९४२३०२२१२३, ७०४०५७००६२ (वेळ दु.३ ते ७)**

# विद्यार्थी गौरव - १०वी


कु.शेजल धिरज गांधी,
पुणे ९७.८०%


कु.किमया आजीनाथ ढेरे,
पारनेर ९६.२०%


कु.श्रेया सुनील वीर,
अस्तगाव ९५.६०%


तेजस संदीप अडसरे,
पिंपरी जलसेन ९५.२०%



कु.अंकिता हरिभाऊ शेळके,
नारायणगव्हाण ९३%



कु.श्रुती संजय झावरे,
गारगुंडी ९२.६०%


अमरेंद्र धनंजय शेंडकर,
लोणी मावळा ९१%


करण सुरेश रणसिंग,
पाडळी कडूस ९१%


रोहीत मुकुंद सोबले,
जामगाव ९०%


कु.शर्वानी नामदेव पडवळ,
लोणी मावळा ९०%



कु.गायत्री जुगलकिशोर रेपाळे,
पुणेवाडी ८२.२०%


कु.अक्षदा ज्ञानेश्वर शेंडकर,
लोणी मावळा ८२%


कु.स्वरांगी बाळासाहेब येणारे,
रायतळे ७८%


कु.श्रेया दिनेश गुंजाळ,
गुंजाळ दैठणे ७८%


कु.पायल बाळासाहेब दिघे,
वडझिरे ७५%


कु.श्रेया शिवाजी विश्वास,
बाभुळवाडे ७४%


अनुज अशोक बोरूडे,
पुणेवाडी ७०%


कु.प्रियंका अशोक रसाळ,
भोयरे गांगर्डा ६९%


कु.वैष्णवी पोपट शिंदे,
निघोज ६५.२०%

# विद्यार्थी गौरव - १२वी शास्त्र


कु.मेघना सुनील नाईक,
जामगाव ९४.६२%



कु.आर्या रामराव लामखडे,
निघोज ९०%


अजीत भास्कर हांडे,
पारनेर ९०%


कु.योगिता नाथा बोरकर,
वडझिरे ८४%


कु.पुजा विठोबा तिकोणे,
वेसदरे ८४%


कु.पुजांगी अशोक गाडेकर,
वडझिरे ८२%


हर्षल सुर्यभान तिकोणे,
पाडळी दर्या ८०%



सिद्धार्थ सुनील व्यवहारे,
कान्हुर पठार ७६%


शुभम दिलीपकुमार रासकर,
नगर ७६%



कु.रूचिरा अभय मुथा,
पुणे ७३%


कु.अक्षदा गंगाधर मुसळे,
वनकुटे ७२%


कु.स्नेहल सुनील पोटे,
बाभुळवाडे ७०%


सुहेल मलीक राजे,
पारनेर ७०%


कु.रिया सुशिलकुमार मुथियान,
कान्हुर पठार ६७%


आशिष प्रकार गोरडे,
लोणी मावळा ६७%


# विद्यार्थी गौरव - १२वी सायन्स


प्रथमेश विजय फल्ले, निघोज ६६%



कु.पुजा संभाजी म्हस्के, शहाजापूर ६६%


कु.आकांक्षा बाळासाहेब डोमे, राळेगण थेरपाळ ६५%


ओंकार तुकाराम शिर्के, कर्जुले हरेश्वर ६५%


सुमीत शिवाजी जगताप, पाडळी आळे ६३%


ओंकार दादाभाऊ शेटे, वडझिरे ६३%



योगेश्वर शिवाजी थिटे, वाळवणे ६२.५%


शुभम सुखदेव केदार, जामगाव ६२%


कु.प्राची रमेश वाळुंज, वडनेर हवेली ६१%


अखिलेश अरविंद ढोले, सुपे ६०%

## १२वी वाणिज्य


सिद्धार्थ राजू लटांबळे, पिंपळनेर ९१%


कु.ऋतुजा शिवाजीराव राऊत, राऊतवाडी ७६%


भूषण उत्तम सुंबरे, पिंपळगाव रोठा ७२%


कु.कोमल सुभाष जगताप, बाबुर्डी ७०%


कु.मधुरा नितीन घोडके, पारनेर ६०%

# ग्रामस्थांचा सत्कार

* **ॲड. पोपटराव भिकाजी सोबले व सौ.शुभदा पोपटराव सोबले**, रा.कान्हूर पठार यांनी पिताश्री **कै.भिकाजी अंकुशराव सोबले गुरूजी (सरकार) व मातोश्री कै.अनुसया भिकाजी सोबले** यांचे स्मरणार्थ मंडळास **रू.१,००,१११/-** देणगी दिली. त्यांची एकूण देणगी **रू.१,२०,१२२/-** झाली आहे.


कै.पाराजी मोरे


श्रीम.शारदा मोरे

* **श्रीमती शारदा पाराजी मोरे**, रा.वडझिरे यांनी त्यांचे दिवंगत पती **कै.पाराजी रंगनाथ मोरे** यांचे स्मृतीप्रित्यर्थ मंडळाच्या वसतिगृहाच्या एका खोलीसाठी **रू.१,००,०००/-** देणगी दिली. विशेष म्हणजे ही देणगी त्यांनी त्यांच्या पेन्शनच्या रकमेमधून दिली. त्यांची एकूण देणगी **रू.१,१६,२००/- झाली आहे.**



* **श्री. संदिप नामदेव जऱ्हाड**, रा. हिवरे कोरडा हे **पुणे महानगरपालिकेच्या** निवडणुकीमध्ये २०१७ ते २०२२ या कालावधीसाठी **नगरसेवक** म्हणून निवडून आले आहेत.



* **श्री. श्रेयस विजयकुमार ठुबे**, रा. कान्हुर पठार हे **सनदी लेखापाल** परिक्षा उत्तीर्ण झाले.



* **प्रा. हरिभाऊ तात्याबा शेळके**, रा. नारायण गव्हाण हे डी.वाय.पाटील कॉलेज, पिंपरी पुणे येथे कार्यरत असून त्यांनी केलेल्या उत्कृष्ठ शैक्षणिक व सामाजिक कार्यामुळे त्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे **आदर्श शिक्षक** पुरस्कार प्रदान करण्यात आला.



* **प्रा. संदिप शिवाजी पठारे**, रा. वाळवणे हे एम्. फार्मसी असून ते भारती विद्यापीठाच्या पुना कॉलेज ऑफ फार्मसी या अनुदानित महाविद्यालया मध्ये **सहाय्यक प्राध्यापक** या पदावर कार्यरत आहेत. त्यांना भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या औषध निर्माण विद्याशाखेची **पी.एच्.डी. पदवी** प्राप्त झाली आहे.



* **श्री. विरेश विजयकुमारजी छाजेड** रा.पळशी यांची **भारतीय जैन संघटना, पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष** पदी २०१६ ते २०१८ या कालावधीसाठी नियुक्ती झाली.

# नांदा सौख्य भरे

* श्री.भास्करराव आनंदराव झंजाड, रा.सुपे यांची सुकन्या **सौ. नेहा** व श्री.अशोकराव आंबेकर, रा.पिंपळे गुरव, पुणे यांचे सुपुत्र **चि. अक्षय** यांचा शुभविवाह **दि.०९.०४.२०१७** रोजी संपन्न झाला.
* प्रा. वसंतराव गोविंदराव ठुबे, रा.कान्हुर पठार यांचे सुपुत्र **चि. विशाल** व श्री. मधुकर सुरेशचंद्र मुळे, रा.श्रीरामपूर यांची सुकन्या **सौ. मानसी** यांचा शुभविवाह **दि.०२.०५.२०१७** रोजी संपन्न झाला.
* श्री. भाऊसाहेब नारायण एरंडे, रा.वडझिरे यांची सुकन्या **सौ. स्नेहल** व प्रा.राजाराम नानाभाऊ पागीरे, रा.पिंपरी पठार यांचे सुपुत्र **चि. विशाल** यांचा शुभविवाह **दि.०४.०५.२०१७** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.एरंडे व श्री.पागीरे कुटुंबियांनी मंडळास प्रत्येकी **रू.१०००/-** दिली.
* श्री. संजय बाबुराव कदम, रा.पिंपरी जलसेन यांचे सुपुत्र **चि. कुणाल** व श्री. सतीश नारायण पुराणिक रा.पुणे यांची सुकन्या **सौ. प्रणिता** यांचा शुभविवाह **दि.१४.०५.२०१७** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.कदम यांनी मंडळास **रू.१०,०००/-** दिली.
* श्री. अनिल वामनराव नाईक, रा.जामगाव यांची सुकन्या **सौ. नयन** व श्री. खंडू रामचंद्र राऊत, रा.केतकी निमगाव, ता.इंदापूर, जि.पुणे यांचे सुपुत्र **चि. राहुल** यांचा शुभविवाह **दि.१८.०५.२०१७** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री. सुनील वामनराव नाईक यांनी मंडळास **रू.२०००/-** दिली.
* श्री. शांताराम तुकाराम निघूट, रा. वडझिरे यांची सुकन्या **सौ. वृषाली** व कै. नारायण शेजवळ पाटील, रा. नाशिक यांचे सुपुत्र **चि. स्वप्निल** यांचा शुभविवाह **दि.२२.०५.२०१७** रोजी संपन्न झाला.
* श्री. सुरेश नामदेव भागवत, रा. कान्हुर पठार यांचे सुपुत्र **चि.ॲड. ऋषिकेश** व श्री. किसनराव नाथा नवले, रा. कान्हुर पठार यांची सुकन्या **सौ. सोनाली** यांचा शुभविवाह **दि.२८.०५.२०१७** रोजी संपन्न झाला.
* कै. प्रकाश झुंजारराव जगदाळे, रा.बाभुळवाडे यांचे सुपुत्र **चि. प्रमोद** व श्री. मच्छिंद्र भानुदास तामखडे, रा. गांजीभोयरे यांची सुकन्या **सौ. ज्योती** यांचा शुभविवाह **दि.०२.०६.२०१७** रोजी संपन्न झाला.
* श्री. राजाराम मारुती भामरे, रा. पिंपळगाव रोठा यांचे सुपुत्र **चि. तुषार** व श्री. किसन भिकाजी गाडीलकर, रा. पळवे खु.।। यांची सुकन्या **सौ. अपेक्षा** यांचा शुभविवाह **दि.०३.०६.२०१७** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.भामरे यांनी मंडळास **रू.१०००/-** दिली.
* कै. सखाराम मारुतराव जगताप, रा. गोरेगाव यांची सुकन्या **सौ. सुवर्णा** व श्री. विजय यशवंत कोरगावकर, रा. पावशी, कुडाळ यांचे सुपुत्र **चि. अमित / नारायण** यांचा शुभविवाह **दि.१०.०६.२०१७** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त सौ. सुवर्णा हिचे बंधू संदिप व सचिन यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.

## दशरथ रामभाऊ वीर
### - एक धडपडे व्यक्तीमत्व



श्री. दशरथ वीर यांचे मूळ गाव अस्तगाव. त्यांचे वडील रामभाऊ दगडूजी वीर यांच्या आईवडीलांचे त्यांच्या लहानपणीच निधन झाले. त्यामुळे त्यांनी त्यांच्या मामाच्या गावी सारोळा कासार, ता. नगर येथे स्थलांतर केले. आणि तेथेच गुरे वळण्याचे काम सुरू केले. नंतर मामाच्याच मुलीशी त्यांचे लग्न झाले. लग्न झाल्यानंतर ते पिंपरी, पुणे येथे मिलीटरी डेअरी फार्ममध्ये नोकरी करू लागले. त्यावेळी म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात डेअरी फार्मची जागा म्हणजे एक जंगलच होते. परंतु रामभाऊ व त्यांच्या पत्नी या दोघांनी तेथे आपला संसार थाटला. त्यांना ६ मुले व ५ मुली झाल्या.

दशरथ यांचा जन्म १० एप्रिल १९४२ रोजी झाला. **दशरथ हा जात्याच हुशार.** त्यांचे पहिली ते सातवी पर्यंतचे शिक्षण पिंपरी गावात झाले. १९५७ मध्ये ७वीला सर्व वर्गामध्ये दशरथ एकटेच पास झाले. त्यावेळी ७ वी म्हणजे व्ह.फा. ला फार मान् होता. त्यांना लगेच शिक्षकाची नोकरी लागत होती. वडीलांची इच्छा होती की त्यांनी नोकरी करावी व संसाराला हातभार लावावा. परंतु मुलाच्या मनात वेगळेच होते. त्यांनी पुणे पालीकेचे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय (नाना वाडा) येथे आठवीला प्रवेश घेतला व १९६१ साली टेक्निकल विषय घेऊन ११वी पास झाले. त्यानंतर इंडस्ट्रियल ट्रेनिंग सेंटर, वाडीया कॉलेज येथे वेल्डर ट्रेडमध्ये १९६२ मध्ये ते पास झाले. काही दिवस बजाज ऑटोमध्ये २ रू. रोजाने काम केल्यानंतर १९६३ च्या जानेवारीमध्ये ते महिना रू.९७.५५ पै. पगारावर हाय एक्सप्लोझीव फॅक्टरी, खडकी येथे कामाला लागले.

नोकरीमध्ये असताना त्यांचा **एस.एम.जोशी, बा.न.राजहंस, बाबा आढाव** या समाजवादी नेत्यांशी जवळून संबंध आला व त्यांचे जीवनच बदलून गेले. त्यांची हुशारी व कामगिरी पाहून त्यांना कामगार प्रतिनिधी म्हणून घेतले. कुठलेही काम मन लावून करीत असल्यामुळे त्यांच्यावर वरिष्ठ अधिकारी खूष असत. तसेच ते खेळामध्येसुद्धा खूप तरबेज असत. हॉलीबॉल हा त्यांचा आवडता खेळ. सेवानिवृत्त होईपर्यंत ते त्या संघाचे कॅप्टन होते. **ते राजपत्रीत अधिकारी म्हणून २००२ मध्ये सेवानिवृत्त झाले.** युनियनमध्ये त्यांना समाजसेवेची आवड निर्माण झाली. सेवानिवृत्ती झाल्यावर ते ज्येष्ठ नागरिक संघाचे सभासद झाले. ते संघात आले त्यावेळेला फक्त २८ सभासद होते. शिवाय कुठलाही पैसा वगैरे काहीच नव्हता. **२००३ ते २००५ मध्ये ते संघाचे सहसचिव झाले, २००७ ते २००९ अध्यक्ष व आता २०१५ ते २०१७ मध्ये परत त्यांची अध्यक्षपदी निवड झाली.** ज्या संघाचे २००२ मध्ये २८ सभासद होते त्या संघाचे आज जवळजवळ ६०० सभासद आहेत. आणि संघ पिंपरी चिंचवडमध्ये जे काही १०० संघ आहेत त्यातील हा एक चांगला संघ आहे. यासाठी श्री.दशरथ वीर यांनी अविश्रांत श्रम घेतले. दरवर्षी स्मरणिका काढून ती विकून त्याच्यामधून त्यांना उत्पन्न मिळते. आज रोजी सदर ज्येष्ठ नागरिक संघ हा आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत आहे. याचे सर्व श्रेय श्री. दशरथ वीर यांनाच जाते. त्यामुळेच आजही ७६ व्या वर्षी त्यांची तब्बेत ठणठणीत आहे व त्याच जोमाने ते काम करतात. त्यांना दिर्घायूष्य लाभो हिच इच्छा !

## सेवानिवृत्ती



* **सौ.कमलाताई शांताराम निघूट,** रा. वडझिरे या चिंचवड येथील मोरया शिक्षण संस्थेच्या माध्यमिक विद्यालयातून मुख्याध्यापिका या पदावरून ३० वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१७** रोजी सेवानिवृत्त झाल्या. सेवेमध्ये कार्यरत असताना त्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे **'आदर्श शिक्षिका'** पुरस्काराने सन्मानित केले होते. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **श्री.गंगाधर ज्ञानदेव पठारे,** रा. वाळवणे हे नॅशनल इन्शुरन्स कंपनीच्या अकौंटस् विभागातून २८ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१७** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



* **श्री. दिलीप फकिरा हरेल,** रा. हिवरे कोरडा हे पुणे महानगरपालिकेच्या नेताजी सुभाषचंद्र बोस या माध्यमिक विद्यालयातून ३८ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१७** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



* **श्री.दिनकरराव अमृतराव घोडके,** रा. कान्हुर पठार हे महाराष्ट्र राज्याच्या महसूल विभागातून ३७ वर्षे ११ दिवसांच्या सेवेनंतर **मंडल अधिकारी** या पदावरून **दि.३१.०५.२०१७** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली. ते अहमदनगर जिल्हा तलाठी संघाचे सरचिटणीस असून सदर संस्थेच्या माध्यमातून त्यांनी अहमदनगर येथे **विद्यार्थी वसतिगृह, नाट्यगृह, सार्वजनिक वाचनालय व व्यापारी संकुलचे बांधकाम** केलेले आहे.




* **श्री.सोपानराव गोदाजी बोरूडे,** रा.पुणेवाडी हे महाराष्ट्र राज्याच्या पोलीस विभागातून **सहाय्यक फौजदार** म्हणून ३८ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३०.०६.२०१७** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



* **श्री. नारायण कोंडीबा गागरे,** रा.वनकुटे हे ३८ वर्षांच्या सेवेनंतर फोर्स इंडिया या कंपनीतून **दि.०१.०६.२०१७** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.११००/-** देणगी दिली.


## निधन वार्ता



* **सदाशिव खंडू मुळे,** वय ९२, रा. कारेगाव यांचे **दि.२३.०१.२०१७** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.बबनराव सदाशिव मुळे** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **श्रीमती राधाबाई शंकरराव भोंडवे,** वय ९०, रा. ढवळपुरी यांचे **दि.३१.०३.२०१७** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.रंगनाथ शंकरराव भोंडवे** यांनी मंडळास **रू.११११११/-** देणगी दिली.




* **मदनलालजी दलीचंदजी शिंगवी**, वय ८८, रा. पारनेर यांचे **दि.०२.०४.२०१७** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.प्रदिप मदनलालजी शिंगवी** यांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.




* **सुखदेव गेणू चत्तर,** वय ९३, रा. सिद्धेश्वरवाडी यांचे **दि.०३.०४.२०१७** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री. रामदास सुखदेव चत्तर** यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



* **श्रीमती अनुसयाबाई भाऊसाहेब पोटे,** वय ९५, रा. बाभुळवाडे यांचे **दि.२८.०४.२०१७** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री. हरिश्चंद्र भाऊसाहेब पोटे** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



* **आनंदराव दादाभाऊ ढोरमले,** वय ६७, रा. जातेगाव यांचे **दि.०५.०५.२०१७** रोजी निधन झाले.⇦



* **विठ्ठलराव यशवंतराव धुमाळ,** वय १०१, रा. टाकळी ढोकेश्वर यांचे **दि.२५.०५.२०१७** रोजी निधन झाले.⇨



* **गुलाबराव दौलतराव पठारे पाटील,** वय ७२, रा. वडुले यांचे **दि.२७.०५.२०१७** रोजी निधन झाले. ⇨

## क्रीडा - गौरव



**कु.अंकिता हरीभाऊ शेळके,** रा.नारायण गव्हाण या विद्यार्थीनीस **डॉ.अब्दुल कलाम आऊटस्टँडींग स्टुडंटस्** भारतीय भाषा परिषद कलकत्ता या संस्थेतर्फे पुरस्कार प्रदान करण्यात आला. पंजाबमध्ये झालेल्या सॉफ्टबॉल असोसिएशन तर्फे **३४वी ज्यु. सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये ती तिसरी** आली.

# आपण असे केले तर



❊ **श्री. अमृतराव क्षीरसागर,** रा. जामगाव यांनी त्यांचे जेष्ठ बंधु **कै.जयवंतराव बळवंतराव क्षीरसागर** यांचे **दि. ०२.०३.२०१७** च्या स्मृती दिना निमित्त मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❊ **पिताश्री वै. सखाराम मारुतराव जगताप** (मृत्यु दिनांक ०६.०१.२०११) **व मातोश्री वै. विजयाबाई सखाराम जगताप** (मृत्यु दिनांक ०३.१०.२०१२) रा. गोरेगाव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री.संदिप व श्री.सचिन यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❊ प्रा.दिलीप वामन बागूल रा.मांडवे खुर्द यांनी त्यांचे सुपुत्र **चि. विश्वजीत** यांच्या **दि.११.४.२०१७**च्या वाढदिवसानिमित्त यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **स्व. बसंतीबाई बन्सीलालजी गांधी** रा.सुपे यांच्या **दि.११.०५.२०१७** च्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री.अशोकलालजी यांनी मंडळास **रू.५००/-** देणगी दिली.



❊ **कै.गिरीधारीलाल बिरदीचंद कटारिया** रा.तिखोल यांच्या **दि.०८.०८.२०१७** च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.नितीन यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. उत्तमचंद रामचंद कर्नावट** रा. खडकवाडी यांनी त्यांचे सुपुत्र **स्व. मनोज** यांच्या दिनांक **१०.०८.२०१७** च्या स्मृती दिनाप्रित्यर्थ मंडळास **रु.११००/-** देणगी दिली.



❊ **श्री.बाळासाहेब हरिभाऊ येणारे,** रा. रायतळे यांनी त्यांचे सुपुत्र **चि. स्वराज** याच्या दिनांक **०९.०४.२०१७** च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.राजाराम नाना पागीरे,** रा. पिंपरी पठार यांनी दिनांक **११.०५.२०१७** रोजीच्या लग्नाच्या वाढदिवसा निमित्त **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **स्व.सौ.शारदाबाई मिश्रीलालजी कर्नावट** रा.वासुंदे यांच्या **दि.१८.०७.२०१७** च्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे पती **श्री. मिश्रीलालजी पेमराजजी कर्नावट** यांनी **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. शरद गणपतराव गाडगे,** रा. विरोली यांनी त्यांच्या दि. **०५.०४.२०१७** च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. राजेंद्र कचरदास घावटे,** रा. जवळे यांनी त्यांच्या मातोश्री **कै. कुसुमताई कचरदास घावटे** यांच्या दिनांक **०९.०२.२०१७** च्या स्मृतीदिनानिमित्त मंडळास **रू.११११/-** देणगी दिली.



श्रीम.विमलाबाई काळे,

❊ **श्रीमती विमलाबाई कृष्णराव काळे,** रा.पिंपरी जलसेन यांनी त्यांच्या नाती (मुलीच्या मुली) **कु.अंकिता सोपानराव गोरे,** रा.नगर हीस मागील वर्षी १०वी मध्ये **९६ टक्के** गुण मिळाले असून तिच्या **११.०५.२०१७** च्या वाढदिवसानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५००/-** देणगी दिली.



कु.माधवी गव्हाणे

तसेच **कु.माधवी शेखर गव्हाणे** रा.पुणे ही वारली पेंटींग प्रोजेक्टच्या स्पर्धेमध्ये पहिली आली. तिच्या **दि.२५.०७.२०१७** च्या वाढदिवसानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५००/-** देणगी दिली. ⇨



कु.सोनाली गव्हाणे

व **कु.सोनाली शेखर गव्हाणे** ही ऑलंपियाड मॅथ व सायन्समध्ये पुणे विभागातून पहिली आली असून ती इ.४ थी मध्ये शिकत आहे. तिच्या **दि.०६.१२.२०१६** रोजीच्या वाढदिवसा निमित्त त्यांनी मंडळास **रू.५००/-** देणगी दिली. ⇨

अशी एकूण **रू.१५००/-** देणगी दिली.

## क्रीडा - गौरव



❊ **कु. ओम सोपान खोसे,** रा. पाडळी दर्या हा विद्यार्थी इ. ७ वी मध्ये असून त्याने **राज्यस्तरीय ॲथलेटीक्स फेडरेशन** तर्फे घेण्यात आलेल्या **१०० मी. रिले स्पर्धेत** सब ज्युनियर गटामध्ये **कास्य पदक** संपादन केले आहे. सदर स्पर्धा डिसेंबर २०१६ मध्ये संपन्न झाली.



❊ **कु.अधिराज सुनिल राजेनिंबाळकर,** रा.गांजीभोयरे हा विद्यार्थी साधना विद्यालय, हडपसर येथे इ. ८ वी मध्ये शिकत असून त्यास **'बॉल बॅडमिंटन'** या क्रिडा प्रकारात विभागीय पातळीवर यश मिळाले असून त्याला राज्यस्तरीय संघामध्ये दुसरा क्रमांक मिळाला.

# कर्तृत्ववान प्राचार्य डॉ.संभाजी अण्णासाहेब पठारे!

कर्तृत्व पारनेरकरांचे




कै.अण्णासो.पठारे रूक्मिणीबाई पठारे

**स्वा**तंत्र्यानंतर भारताने अनेक स्तरावर प्रगती केली. आज आपली अंतराळ याने अवकाशात विहार करीत आहेत. पण आजही पारनेर तालुक्यातील वडुले या गावी एस.टी. जात नाही ही वस्तुस्थिती आहे. **संभाजी अण्णासाहेब पठारे** यांचा जन्म १ जून, १९६१ ला झाला. वडुले येथील **कै.भाऊसाहेब दौलतराव पठारे पाटील आणि श्री.ज्ञानदेव दौलतराव पठारे पाटील** यांचे कुशल व भक्कम नेतृत्व लाभलेल्या सुमारे ५० माणसांच्या खानदानी कुटुंबात ते वाढले. **आई रूक्मिणीबाई** या प्रसिद्ध किर्तनकार सोपानकाका औटी यांच्या भगिनी व **वडील अण्णासाहेब पाटील** यांनी आयुष्यभर शेती केली. आईवडील दोघेही अशिक्षित पण आपल्या मुलांनी शिकून मोठं व्हावं हेच त्यांचे ध्येय. त्यांच्या सहा मुलांपैकी संभाजी दुसरे. चौथीपर्यंत गावातल्याच एकशिक्षकी शाळेत (चावडीत) त्यांचे शिक्षण झाले. पुढील शिक्षणाची सोय गावात नसल्याने शेजारच्या पिंपळनेर (निळोबाचे) या गांवी ७ वी पर्यंतचे त्यांनी शिक्षण पूर्ण केले.

५ वी ते ७ वी ही तीन वर्षांची दररोज ५ मैलांची अनवाणी पायपीट त्यांच्या मनात संस्मरणीय ठरली व इथेच त्यांच्यामध्ये शिक्षणाची जिद्द निर्माण झाली. त्यानंतर त्यांनी शिरूर (घोडनदी) येथील विद्याधाम प्रशालेमध्ये आठवीत प्रवेश घेतला. एवढी मोठी शाळा त्यांनी प्रथमच पाहिली व ते भारावून गेले. या विद्यालयात त्यांना इंग्रजी विषयाची विशेष आवड निर्माण झाली. चित्रकलेतही पारंगत. शिरूर तालुका स्तरावर कॅमलिन कंपनीने घेतलेल्या चित्रकला स्पर्धेत ते प्रथम आले. असे असूनही एस.एस.सी. नंतर त्यांचा कल विज्ञानाकडे राहिला. विद्याधाममध्येच ११वी विज्ञान वर्गात प्रवेश घेतला. १२वीची परीक्षा, शिरूरला केंद्र नसल्याने मंचरच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात झाली. वर्गातील ४२ पैकी फक्त १८ विद्यार्थी बारावी उत्तीर्ण झाली. त्यात संभाजी पठारे हेही होते. इथे त्यांच्या शिक्षणाचा पूर्वार्ध पूर्ण झाला.

शिरूरमध्ये त्यांच्या-बरोबर त्यांचे बंधू दादासाहेब पठारे हेही असत. पहिली २ वर्षे संभाजी व दादासाहेब त्यांच्या मामाकडे राहात असत. मुलांना दुध मिळावं म्हणून नानांनी (भाऊसाहेब पठारे) एक गाय दिली होती. या **गाईची निगा राखणे, शेणकूर करणे, गोवऱ्या थापणे, घरातलं पिण्याचं पाणी भरणे इ. कामे संभाजी करत असत**. त्यानंतरची तीन वर्षे त्यांनी एक खोली घेऊन चुलीवर हाताने स्वयंपाक करून आपली गुजराण केली. या ठिकाणी स्वावलंबन म्हणजे काय असते याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली.

त्याकाळी शिरूर किंवा पारनेरच्या महाविद्यालयांमध्ये विज्ञान पदवीच्या शिक्षणाची सुविधा नव्हती. त्यामुळे त्यांना नगर अथवा पुणे येथे शिक्षण घेणे अनिवार्य होते. पुणे हे विद्येचे माहेरघर असल्यामुळे त्यांनी पुण्यातच शिक्षण घेण्याचे ठरविले. पुणे येथे सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून (एस.पी.कॉलेज) त्यांनी १९८१ ला बी.एस्सी. तर १९८३ ला एम.एस्सी. ची पदवी संपादन केली. एम.एस्सी. करत असताना त्यांनी वसतिगृहात पर्यवेक्षक म्हणून कामही केले, ज्यामुळे त्यांची राहण्याची सोय मोफत झाली. घराण्यातच नेतृत्व गुण असल्यामुळे त्यांची वसतिगृहाच्या पर्यवेक्षक पदासाठी १८० विद्यार्थ्यांमधून निवड झाली. **एम.एस्सी.चे शिक्षण घेत असतांनाच त्यांनी आय.आय.टी.ची 'गेट' (GATE) परीक्षा दिली व त्यात ८६.६६ स्कोअर मिळून दिल्ली आय.आय.टी. मध्ये एम.टेक. या अभ्यासक्रमासाठी त्यांची निवड झाली.**



डॉ.संभाजी पठारे

दिल्लीला जाण्यासाठी घरातून झालेला विरोध झुगारून दादासाहेबांच्या मदतीने ते हॉझखास (दिल्ली) ला पोहोचले देखील. दरम्यान अहमदनगरच्या जिल्हा मराठा संस्थेत केलेल्या अर्जावरून त्यांना प्राध्यापक पदाच्या मुलाखतीचा कॉल आला, त्यामुळे ते दिल्लीहून परत आले. संभाजी मुलाखत दोन कारणांसाठी टाळत होते, एकतर दिल्लीत एम.टेक. करायचे होते (यासाठी केंद्र सरकारची रू.८४०/- दरमहा शिष्यवृत्ती मंजूर झाली होती) व एम.एस्सी.च्या अंतिम परीक्षेचा निकाल लागला नव्हता. मुलाखत चांगली झाल्याने त्यांना पहिलाच क्रमांक मिळाला व ४ दिवसांनी नोकरीत रूजू होण्याचा आदेशही मिळाला. १८ जुलै १९८३ ला संभाजी प्राध्यापक झाले. मुळातच कामसू व विषयाची सर्वांगिण तयारी करणारे पठारे सर हे लवकरच विद्यार्थ्यांमध्ये प्रिय शिक्षक झाले व त्यांची खूप वाहवा झाली. याची दखल घेत **महाराष्ट्र शासनाने त्यांना ५ सप्टेंबर, २००८ रोजी 'उत्कृष्ठ शिक्षक' पुरस्काराने सन्मानित केले. सदर पुरस्कार तत्कालीन उपमुख्यमंत्री आर.आर. पाटील यांचे हस्ते व नगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.दिलीपराव वळसे पाटील यांचे उपस्थितीत प्रदान करण्यात आला. पुरस्काराची रक्कम त्यांनी बिहार पुरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री निधीत जमा केली.**



**महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासमवेत प्राचार्य डॉ.संभाजीराव पठारे**

प्राध्यापक असतानांच त्यांनी विद्यापीठ **'सिनेट'ची** निवडणूक लढविली. प्राध्यापकांमधून ते निवडून आले व **सलग ११ वर्षे सिनेट सदस्य** राहिले. याबरोबरच **विद्या परिषद, व्यवस्थापन परिषद, अभ्यास मंडळ, क्रीडा मंडळ इ. मंडळांचेही त्यांना सदस्यत्व** लाभले पुणे विद्यापीठाचे 'कुलगुरू' पद वगळता अन्य सर्व पदांवर काम करण्याची संधी मिळाल्याचे ते

आवर्जून सांगतात. मे, २०१७ ला झालेल्या कुलगुरू निवड यादीतील ९२ जणांमध्ये त्यांचा ३६ वा क्रमांक होता. ही पारनेरवासीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.



मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार' स्विकारताना प्राचार्य डॉ.संभाजीराव पठारे

**पुणे विद्यापीठ 'व्यवस्थापन परिषद सदस्य'** असताना त्यांच्या अध्यक्षते-खाली एक चौकशी समिती नियुक्त केली होती. त्यांनी दडपण असतानासुद्धा चौकशीच्या अहवालात दोषी अधिकाऱ्याला तात्काळ निलंबीत करावे असा निर्णय दिला होता. काम करण्याची जिद्द व निर्णय घेण्याची क्षमता इ. गोष्टींमुळे कुलगुरूंनी त्यांना **पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक** केले. तिथे सहा वर्षांच्या कालखंडात त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला. विद्यार्थी कल्याणाच्या सुमारे २२ नवीन योजना सुरू केल्या. संचालक पदाच्या कालखंडात त्यांनी अनेक देशी-विदेशी विद्यापीठांना भेटी दिल्या. इस्त्राईलमध्ये १ महिना, जर्मनीमध्ये ११ दिवसांचे व दुबईत ६ दिवसांचे त्यांना वास्तव्य लाभले. सदर भेटीमुळे त्यांचे शिक्षण क्षेत्रातील अनुभव विश्व समृद्ध होण्यास मदत झाली.

नोकरी करीत असताना गावाकडच्या अडचणी व कुटुंबातील शिक्षणाचा अभाव या बाबींचा विचार करून सख्खे भाऊ, चुलत भाऊ, भावांची-बहिणींची मुलं अशा ११ जणांना पदवीधर केले. त्यांचेवर चांगले संस्कार केले. याच काळात त्यांनी स्वतःदेखील **एम.फिल व पी.एच्.डी.** पदवी मिळवली.

ते ६ वर्षे **पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक** होते. परंतू ज्या ग्रामीण भागातून ते आले त्या ग्रामीण भागात आपल्या शिक्षणाचा तळागाळात उपयोग करण्याची त्यांची इच्छा होती. म्हणून संचालक पदाचा राजीनामा देऊन ते एप्रिल २०११ मध्ये राहुरीच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्यपदी रुजू झाले. महाविद्यालयात त्यांनी अत्यंत वेगाने विकास घडवून आणला. २०१२ ला ११ नवीन अभ्यासक्रम सुरू केले. **पुणे विद्यापीठाने २०१२-२०१७ या ५ वर्षांत दोन वेळा 'उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार' राहुरी महाविद्यालयाला दिला आहे.** २०११ मध्ये २८०० विद्यार्थी महाविद्यालयात होते. सध्या ४५०० हून अधिक विद्यार्थी तिथे उच्च शिक्षण घेत आहेत. निसर्गरम्य परिसर व दुर्मिळ **'कॅक्टस उद्यान'** ही महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये असली तरी या महाविद्यालयाने विद्यापीठात पहिले येणारे २७ विद्यार्थी दिले आहेत. **महाराष्ट्र शासनाने २०१५ चा 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार' नुकताच (२१ मार्च, २०१७) महाविद्यालयास प्रदान केला आहे. हा पुरस्कार १ लाख रू.चा असून मा. मुख्यमंत्री व राज्यपाल यांचे शुभहस्ते तो प्राचार्य डॉ.संभाजी पठारे यांनी स्विकारला.**

या सर्व सकारात्मक बदलांची नोंद घेऊन **देशातील महाविद्यालयांचे परीक्षण करणाऱ्या 'नॅक' या संस्थेने 'बी' ग्रेड असलेल्या या राहुरी महाविद्यालयाला ऑक्टोबर २०१३ मध्ये 'ए' ग्रेड प्रदान केली आहे.** पारनेर तालुक्याच्या अत्यंत दुर्गम भागात वसलेल्या वडुले येथील या सुपुत्राचे नाव राहुरी तालुक्याच्या घराघरांत अल्पावधीतच पोचले, एवढेच नव्हे तर उच्च शिक्षण क्षेत्रात **'डॉ.संभाजी पठारे'** हे नाव परिचीत नसलेली व्यक्ती आपणास दुर्मिळ असेल. या सर्व बाबींची दखल घेऊन भारत सरकारच्या **'नियोजन व विकास मंडळाने' (Planning Commission of India) त्यांची एका अभ्यासगटात सदस्यपदी** निवड केली होती.

डॉ. पठारे पुण्यामध्ये असताना पारनेर तालुका मित्र मंडळाच्या कामात सक्रिय भाग घेत असत. मंडळातर्फे पारनेर तालुक्यामध्ये १०वी १२वीच्या मुलांना विशेष व्यावसायिक मार्गदर्शन करावे असे सर्वानुमते ठरले. त्या काळात मंडळाने डॉ.पठारे यांच्या सहकार्याने तालुक्यामध्ये अनेक ठिकाणी १०वी-१२वीच्या मुलांची शिबीरे घेतली व यशस्वी केली.

अशिक्षित आईवडिलांचा मुलगा, अनवाणी शाळा इथपासून ते नियोजन मंडळापर्यंतचा प्रवास संघर्षमय असूनही मिळविलेल्या यशाचा त्यांना गर्व नसून, उलट पारनेर तालुक्याचा सुपुत्र असल्याचा अभिमान आहे. त्यांची पत्नी सौ.चंदा या पदवीधर असून त्यांनी कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पार पाडल्याने डॉ.संभाजी पठारे यांनी शिक्षण क्षेत्रात प्रगती केली.

वडील म्हणून कुठलाही निर्णय त्यांनी मुलांवर लादला नाही. संस्कार कृतीमधून शिकवले. घरात सतत भावंड व त्यांची मुलं शिकायला होते. पण स्वतःच्या मुलांना कधीही स्पेशल ट्रीटमेंट नव्हती. मुलांना शिकवून मोठे करणे हे प्रत्येक पालकाचे काम असते. पण समाजात वावरताना सात्विक व मुक्त विचार, स्पष्टवक्तेपणा, संघटन कौशल्य व आपल्या कामातून सतत लोकांचा विचार करण्याची व समाजात मिसळून जाण्याची वृत्ती, यश अपयश पचविण्याची उर्मी, ही आयुष्यभराची शिदोरी त्यांनी मुलांना दिली. **मुलगा श्री.जयदीप व सून सौ.निकीता** हे दोघेही सॉफ्टवेअर इंजिनिअर आहेत. **कन्या डॉ.सौ.चैताली** या बी.डी.एस. आणि एम.पी.एच. पदवी संपादन करून सध्या एका आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्पात कार्यमग्न आहेत.

पारनेर तालुक्याचे नाव शिक्षण क्षेत्राच्या नकाशावर कोरणाऱ्या मा.डॉ.संभाजी पठारे यांना त्यांच्या कार्यास पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे तर्फे लाख लाख शुभेच्छा!

**शब्दांकन - हौसाराम घोडके**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## जमा-खर्च पत्रक १.४.२०१६ ते ३१.०३.२०१७ अखेरचे

| जमा | रक्कम रू. | रक्कम रू. | खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक** | | | लिहीणावळ खर्च | १७,५००.०० | |
| रोख | ७१.०० | | ऑडिट फी | १२,५००.०० | |
| बँक ऑफ महाराष्ट्र ५३५१ | २,७३,३२५.०० | | बँक चार्जेस | ४७५.७५ | |
| स्टेट बँक ४९७८ | ३,९४,०२८.०० | | साफसफाई खर्च | ८,३३८.०० | |
| महानगर को-ऑप.बँक १६१ | ५६,७८४.०० | | शैक्षणिक मदत | ८,०००.०० | |
| सुवर्णयुग सह.बँक १७७० | २,२८,२४९.९० | | इलेक्ट्रिक देखभाल व दुरुस्ती | १८,१२५.०० | |
| | ---------- | ९,५२,४५७.९० | विज बिल खर्च | १,५५,९७०.०० | |
| | | | मासिक सभा खर्च | ५,२०५.०० | |
| बचत ठेव व्याज खाते | | ४६,८८४.०० | पी.सी.एम.सी. कर | ४६,०४४.०० | |
| मुदत ठेव व्याज खाते | | २,४९,९०७.०० | पोस्टेज | ६,२०४.०० | |
| | | | छपाई स्टेशनरी खर्च | ५७,९९१.०० | |
| इमारत निधी | | १४,९१,२२६.०० | पगार व्यवस्थापक | १,२०,०००.०० | |
| | | | देखभाल व दुरुस्ती खर्च | ४९,०३०.०० | |
| वसतिगृह शुल्क | | ९,७९,१४५.०० | स्नेहमेळावा खर्च | १३,८८०.०० | |
| फॉर्म फी | | २,७६०.०० | बिगर शेतसारा कर | ८१६.०० | |
| वसतिगृह विलंब शुल्क | | ५,६४०.०० | दिवाळी बोनस | ११,५००.०० | |
| वसतिगृह विज बिल जमा | | ७,९१८.०० | वैद्यकिय मदत | ३,०००.०० | |
| | | | वकील फी | ३,०००.०० | |
| निविदा फॉर्म फी | | १,५००.०० | स्विपर पगार | ४८,०००.०० | |
| | | | प्रवास खर्च | १६,२३५.०० | |
| टी.डी.एस. २०१४-१५ परतावा | | २९,७०७.०० | वॉचमन पगार | १,३२,०००.०० | |
| टी.डी.एस. २०१५-१६ परतावा | | ३१,०८४.०० | पाणीपट्टी | १,५११.०० | |
| टी.डी.एस. परतावा व्याज | | ३,३१९.०० | वेबसाईट खर्च | ९,०००.०० | |
| | | | झेरॉक्स व टायपींग खर्च | ४,१८८.०० | |
| | | | किरकोळ खर्च | ८८.२५ | |
| नाट्यगृह ठेव | | १,७००.०० | | ---------- | ७,४८,६०१.०० |
| टी.डी.एस. ठेकेदार | | ८९,१६९.०० | नाट्यगृह ठेव | | १,७००.०० |
| मुदत ठेव जमा | | १५,८२,०३०.०० | टी.डी.एस. ठेकेदार | | ८९,१६९.०० |
| अनामत | | १,१६,०००.०० | मुदत ठेव नावे | | ४,२८,६८२.०० |
| टेंडर ठेव | | ४,६९,१००.०० | अनामत | | १,२५,०००.०० |
| वसतिगृह सुरक्षा ठेव | | १,३८,०००.०० | टेंडर ठेव | | २,५८,९००.०० |
| सुरक्षा ठेव - बांधकाम | | १,०८,६३९.०० | वसतिगृह सुरक्षा ठेव | | १,०७,३००.०० |
| | | | बांधकाम खर्च | | ४४,५५,४९८.०० |
| व्याज येणे जमा | | ३०,८०६.०० | टी.डी.एस. २०१६-१७ | | २०,२७२.०० |
| | | | **अखेर शिल्लक** | | |
| | | | रोख | ८,५००.०० | |
| | | | बँक ऑफ महाराष्ट्र ५३५१ | २६,०७५.०० | |
| | | | स्टेट बँक ४९७८ | ११,७९९.७५ | |
| | | | महानगर को-ऑप.बँक १६१ | ३०,१८०.०० | |
| | | | सुवर्णयुग सह.बँक १७७० | २५,३१५.१५ | |
| | | | | --------- | १,०१,८६९.९० |
| **एकूण रक्कम** | | **६३,३६,९९१.९०** | **एकूण रक्कम** | | **६३,३६,९९१.९०** |

| | | | |
|---|---|---|---|
| **सुनील पोटे** | **मधुकर शिरोळे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके ॲंड कं.** |
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## उत्पन्न खर्च पत्रक १.४.२०१६ ते ३१.३.२०१७ अखेरचे

| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. | उत्पन्न | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| लिहीणावळ खर्च | १७,५००.०० | | बचत ठेव व्याज खाते | | ४६,८८४.०० |
| ऑडिट फी | १२,५००.०० | | मुदत ठेव व्याज खाते | | २,४९,९०७.०० |
| बँक चार्जेस | ४७५.७५ | | | | |
| साफसफाई खर्च | ८,३३८.०० | | वसतिगृह शुल्क | | ९,७९,१४५.०० |
| शैक्षणिक मदत | ८,०००.०० | | फॉर्म फी | | २,७६०.०० |
| इलेक्ट्रिक देखभाल व दुरुस्ती | १८,१२५.०० | | | | |
| विज बिल खर्च | १,५५,९७०.०० | | टी.डी.एस. परतावा व्याज | | ३,३१९.०० |
| मासिक सभा खर्च | ५,२०५.०० | | | | |
| पी.सी.एम.सी. कर | ४६,०४४.०० | | वसतिगृह विलंब शुल्क | | ५,६४०.०० |
| पोस्टेज | ६,२०४.०० | | वसतिगृह विज बिल जमा | | ७,९१८.०० |
| छपाई स्टेशनरी खर्च | ५७,९९१.०० | | | | |
| पगार व्यवस्थापक | १,२०,०००.०० | | निविदा फॉर्म फी | | १,५००.०० |
| देखभाल व दुरुस्ती खर्च | ४९,०३०.०० | | | | |
| स्नेहमेळावा खर्च | १३,८८०.०० | | | | |
| बिगर शेतसारा कर | ८१६.०० | | | | |
| दिवाळी बोनस | ११,५००.०० | | | | |
| वैद्यकिय मदत | ३,०००.०० | | | | |
| वकील फी | ३,०००.०० | | | | |
| स्विपर पगार | ४८,०००.०० | | | | |
| प्रवास खर्च | १६,२३५.०० | | | | |
| वॉचमन पगार | १,३२,०००.०० | | | | |
| पाणीपट्टी | १,५११.०० | | | | |
| वेबसाईट खर्च | ९,०००.०० | | | | |
| झेरॉक्स व टायपींग खर्च | ४,१८८.०० | | | | |
| किरकोळ खर्च | ८८.२५ | | | | |
| | ---------- | ७,४८,६०१.०० | | | |
| घसारा | | ५७,०१५.०० | | | |
| नफा ताळेबंदास वर्ग | | ४,९१,४५७.०० | | | |
| **एकूण रक्कम** | | **१२,९७,०७३.००** | **एकूण रक्कम** | | **१२,९७,०७३.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **सुनील पोटे** | **मधुकर शिरोळे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# अभिनंदन



❊ पारनेर तालुका मित्र मंडळाचे सदस्य सेवाभावी **डॉ.रसिक मोतीलालजी शेटिया,** रा. हंगे यांच्या **एकसष्ठीपूर्तीनिमित्त** त्यांचा **महापौर प्रशांत जगताप** यांच्या हस्ते **सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.**

❊ **कु.निकिता ठुबे,** रा.कान्हुर पठार या मुलीने इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त केल्यानंतर अभिनयाच्या आवडीमुळे **दिल्ली येथील नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये प्रवेश** मिळविला आहे.



# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## ताळेबंद पत्रक ३१.०३.२०१७अखेरचे

| जिंदगी व देणी | रक्कम रू. | रक्कम रू. | स्थावर मालमत्ता व येणी | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| **ट्रस्ट निधी** | | | **स्थिर मालमत्ता** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ७३,२९४.०० | **जमीन खरेदी** | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | ८,४५,३११.०० |
| **इतर निधी** | | | **इमारत बांधकाम** | | |
| **इमारत निधी** | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | ६३,०३,५०५.०० | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,४४,५९,५५०.०३ | | अधिक जमा – चालू वर्षी | ४४,५५,४९८.०० | |
| अधिक जमा – चालू वर्षी | १४,९१,२२६.०० | | | ----------- | १,०७,५९,००३.०० |
| | ------------ | १,५९,५०,७७६.०३ | **टी.डी.आर. –** | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | २१,१३,१०५.०० |
| **शैक्षणिक फंड –** | | | **पी.सी.एम.सी. चार्जेस (बांधकाम)** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९६,७२५.०० | मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,५३,१००.०० |
| **अंत्यविधी जमा निधी –** | | | **बोअरवेल –** मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०५०.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,३०,१२२.०० | **मोटर पंप –** | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | १७,६१६.०० | |
| **वसतिगृह सुरक्षा ठेव –** | | | वजा – घसारा १०% | १,७६२.०० | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,२४,७५६.०० | | | -------- | १५,८५४.०० |
| अधिक जमा – चालू वर्षी | १,३८,०००.०० | | **फर्निचर व फिक्चर्स –** | | |
| | ---------- | | मागील ताळेबंदाप्रमाणे | ५,४५,६८७.०० | |
| | २,६२,७५६.०० | | वजा – घसारा १०% | ५४,५६९.०० | |
| वजा – चालू वर्षी | १,०७,३००.०० | | | --------- | ४,९१,११८.०० |
| | ---------- | १,५५,४५६.०० | **वॉटर प्युरिफायर खरेदी** | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | ६,८३६.०० | |
| **उत्पन्न खर्च खाते –** | | | वजा – घसारा १०% | ६८४.०० | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ११,७०,३४७.८७ | | | ------- | ६,१५२.०० |
| चालू वर्षी | ४,७६,९५७.०० | | **वृक्ष संवर्धन ठेव –** मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९,०००.०० |
| | ----------- | १६,४७,३०४.८७ | **एम.एस.सी.बी. डिपॉझीट –** मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०००.०० |
| | | | **मुदत ठेव** | | २९,२८,६८२.०० |
| **टेंडर ठेव –** | | | **अनामत** | | |
| अधिक जमा – चालू वर्षी | ४,६९,१००.०० | | घशिंग | ६,०००.०० | |
| वजा – चालू वर्षी | २,५८,९००.०० | | संजय जंगम | २,०००.०० | |
| | ---------- | २,१०,२००.०० | नाटेकर | १,०००.०० | |
| | | | | ------- | ९,०००.०० |
| सुरक्षा ठेव – बांधकाम | | १,०८,६३९.०० | टी.डी.एस. २०१६–१७ | | २०,२७२.०० |
| | | | **रोख व बँक शिल्लक –** | | |
| | | | रोख | ८,५००.०० | |
| | | | बँक ऑफ महाराष्ट्र ५३५१ | २६,०७५.०० | |
| | | | स्टेट बँक ४९७८ | ११,७९९.७५ | |
| | | | महानगर को–ऑप.बँक १६१ | ३०,१८०.०० | |
| | | | सुवर्णयुग सह.बँक १७७० | २५,३१५.१५ | |
| | | | | --------- | १,०१,८६९.९० |
| **एकूण रक्कम** | | **१,८३,७२,५१६.९०** | **एकूण रक्कम** | | **१,८३,७२,५१६.९०** |

| **सुनील पोटे** | **मधुकर शिरोळे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

।। विना सहकार नाही उद्धार ।।

# श्री साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित



नोंदणी क्र.: पीएनए/एचएलआय/आरएसआर /९४१/१९९३-९४ स्थापना : ३ मे १९९३

आशियाना टॉवर्स, सातपुडा हौसिंग सोसा. सांगवी, पुणे - २७. मो.: ९०११५५८११०

मूळच्या अ'नगर जिल्ह्यातील परंतु पुणे येथे स्थायीक झालेल्या मंडळींनी सामाजिक जाणीवेचे भान ठेवून स्थापित केलेली व अल्पावधीत सभासदांच्या विश्वासास पात्र ठरलेली पतपेढी. संस्थेची वैशिष्ट्ये–

✣ संस्थेच्या मालकीचे संगणकीकृत कार्यालय ✣ तत्पर सेवा ✣ ठेवीवर आकर्षक व्याजदर ✣ सभासदांच्या गुणवान पाल्यांचा यथोचित सत्कार ✣ विनयशील कर्मचारी वर्ग ✣ सभासदांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यावर जास्तीत जास्त भर.



श्री.सखाराम कोंडिबा गागरे
संस्थापक अध्यक्ष




श्री.अरुण मार्तंड नरसाळे
अध्यक्ष




श्री.कुंडलिक विश्वनाथ घोडके
उपाध्यक्ष




श्री.पोपटराव आनंदराव जाधव
संचालक



श्री.गोविंद दामोधर ढोरमले
संचालक



श्री.पांडुरंग विश्वनाथ चाफे
संचालक



श्री.नवीनचंद्र श्रीकिसन नाबरिया
संचालक



श्री.निशांत रंगनाथ गिरी
संचालक




सौ.अलका दिलीप हरेल
संचालिका



सौ.राधाबाई मुरलीधर चौधरी
संचालिका



श्री.सोमा भिमा दाते
संचालक




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु असून विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री.सुनील तोटे (suniltote11@gmail.com) (M: 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून **'पारनेर भवन', मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३** येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.

या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## बुक - पोस्ट
(छापील मजकूर)

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ठुबे**
ए-६०५, ''शुभकल्याण'' नांदेड सिटी,
सिंहगड रोड, पुणे ४११०४१.
मो.: ९४२२०२६२२५

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०

श्रीमान ____________________

____________________

____________________

____________________